क्र.जिपगों/शिविप्रा/खाप्रांशा/कार्या-६/वशि/ ६३६ /२०२४
कार्यालय- जिल्हा परिषद, गोंदिया
(शिक्षण विभाग प्राथमिक)
दिनांक - २६/१२/२०२४

व्यवस्थापन :- अध्यक्ष/सचिव, बहुउददेशिय कृषि विकास शिक्षण संस्था, तिरोडा ता.तिरोडा जि.गोंदिया

विषय :- बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९ यांच्या कलम १८ च्या प्रयोजनार्थ बालकांना मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क नियम २०११ च्या नियम ११, पोटनियम (४) अन्वये शाळांना मान्यता प्रमाणपत्र देण्याबाबत.

संदर्भ :- आपले पत्र क्र. ४९/२०२४ दिनांक ०६.०८.२०२४ च्या अर्जाच्या संदर्भानुसार आणि त्यानंतर या संदर्भात शाळेशी केलेल्या पत्रव्यवहार / शाळेची तपासणी च्या आधारावर.

मी शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद,गोंदियां दिनांक ०१/०७/२०२४ ते ३०/०६/२०२७ पर्यंत (३ वर्षाच्या) कालावधीसाठी इयत्ता १ ली ते ८ वी करीता के.पी.असाटी पब्लिक स्कुल, पालडोंगरी ता.तिरोडा जि.गोंदिया (शाळेचे नांव, पत्यासह) शाळेस तात्पुरती मान्यता देण्यात येत आहे.

<u>वरील मान्यता ही खालील शर्तीच्या अधिन आहे.</u>

१) मान्यतेचा कालावधी वाढवून मिळणार नाही आणि इयत्ता आठवीनंतर मान्यता किंवा संलग्णता देण्यास कोणत्याही परिस्थितीत कोणतेही बंधन नसेल.

२) बालकांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिनियम,२००९ (जोडपत्र एक) आणि महाराष्ट्र बालकांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम,२०११ (जोडपत्र दोन) मधील तरतुदींचे, शाळा पालन करील.

३) शाळा नजीकच्या दुर्बल घटकातील आणि वंचित गटातील बालकांना पहिल्या इयत्तेत त्या इयत्तेतील विद्यार्थीसंख्येच्या किमान २५% मर्यादेपर्यंत प्रवेश देईल आणि प्राथमिक शिक्षण पुर्ण होईपर्यंत त्यांना मोफत व सक्तीचे शिक्षण देईल परंतु आणखी असे की, पुर्व प्राथमिक इयत्तांच्या बाबतीत देखील या प्रमाणकाचे अनुपालन करण्यात येईल.

४) परिच्छेद ३ निर्दिष्ट केलेल्या बालकांकरीता शाळेला अधिनियमाच्या कलम १२(२) नुसार प्रतिपुर्ती मिळेल, अशी परिपुर्ती मिळण्यासाठी शाळेला स्वतंत्र बँक खाते देण्यात येईल.

५) संस्था/शाळा कोणतीही कॅपिटेशन फी वसुल करणार नाही आणि कोणत्याही छाननी पध्दतीसाठी बालकांस किंवा त्यांच्या किंवा तिच्या माता-पित्यास किंवा पालकास भाग पाडणार नाही.

६) कोणत्याही बालकास वयाच्या पुराव्याच्या अभावी,धर्म,जात किंवा वंश, जन्मठिकाण किंवा यापैकी कोणत्याही कारणास्तव, शाळेमध्ये प्रवेश नाकारण्यात येणार नाही.

७) (एक) शाळेत प्रवेश दिलेल्या कोणत्याही बालकास तो ज्या इयत्तेत असेल त्याच इयत्तेत रोखुन ठेवले जाणार नाही किंवा प्राथमिक शिक्षण पुर्ण होईपर्यंत शाळेतनु काढून टाकण्यात येणार नाही.

(दोन) कोणत्याही बालकास शारीरिक शिक्षा किंवा मानसिक त्रास देण्यात येणार नाही.

(तीन) कोणत्याही बालकास प्राथमिक शिक्षण पुर्ण होईपर्यंत कोणत्याही मंडळाची परिक्षा उर्तीण होणे आवश्यक असणार नाही.

(चार) प्राथमिक शिक्षण पुर्ण केलेल्या प्रत्येक बालकास, नियम २३ अन्वये निर्धारीत केलेले प्रमाणपत्र देण्यात येईल.

(पाच) विकलांग/विशेष गरजा असलेल्या विद्यार्थ्यांच्या अधिनियमाच्या तरतुदीनुसार समावेश करण्यात येईल.

(सहा) अधिनियमाच्या कलम २३(१) अन्वये निर्धारित केलेली किमान अर्हता धारण करणा-या शिक्षकांची नियुक्ती करण्यात येईल परंतु आणखी असे की, अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकास किमान अर्हता धारण न करणा-या शिक्षकांना अशी किमान अर्हता ५ वर्षाच्या कालावधीत संपादित करावी लागेल.

(सात) अधिनियमाच्या कलम २४(१) मध्ये विनिर्दिष्ट केलेली त्याची/तिची कर्तव्ये शिक्षक पार पाडतील, आणि

(आठ) शिक्षकाने /शिक्षकेने खाजगी शिकवणीच्या कामात स्वत:ला गुंतवून घेऊ नये.

८) राज्य शासनाच्या प्राधिकरणाने निर्धारित केलेल्या अभ्यासक्रमाच्या आधारे तयार केलेल्या पाठ्यक्रमाचे पालन करील.

K. P. ASATI PUBLIC SCHOOL
TIRORA
PALDONGRI

Stupadhyay
PRINCIPAL
K.P. Asati Public School
Paldongri (Tirora)
CBSE AFF.NO.1130326

९) शाळा, अधिनियम कलम १९ मध्ये विहित केल्याप्रमाणे शाळेत उपलब्ध असलेल्या सुविधांच्या तुलनेत विद्यार्थ्यांना प्रवेश देईल.

१०) शाळा अधिनियमाच्या कलम १९ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या मानकांचे व प्रमाणांचे पालन करील. मागील तपासणीच्या वेळेत शाळेत उपलब्ध असलेल्या सुविधा खालीलप्रमाणे होत्या :-

- शाळेच्या परिसराचे क्षेत्रफळ :- १०१३७.३४ चौ. मी.
- एकुण बांधकाम क्षेत्र. :- १६०५ चौ. मी.
- खेळाच्या मैदानाचे क्षेत्रफळ. :- ८००० चौ.मी.
- वर्गखोल्यांची संख्या. :- १३
- कार्यालय-नि-भांडार-नि-मुख्याध्यापकाची खोली. :- १६
- मुलांसाठी व मुलींसाठी स्वतंत्र्य प्रसाधनगृहे जेथे वापरण्यासाठी व प्रसाधन गृहे स्वच्छ आणि आरोग्यदायी स्थितीत ठेवण्यासाठी पुरेसे पाणी असेल. :- आहे
- पिण्याच्या पाण्याची सुविधा. :- आहे
- दुपारचे जेवन शिजविण्यासाठी स्वयंपाकघर. :- आहे
- अध्यापन अध्ययन साहित्य / खेळ व क्रिडाविषयक सामग्री/ ग्रंथालय यांची उपलब्धता. :- आहे
- वाचन साहित्य विनाधासास उपलब्ध. :- आहेत

११) मान्यता नसलेले वर्ग किंवा तुकडया, शाळेच्या परिसरात किंवा इतरत्र, चालविता येणार नाहीत.

१२) शाळेची इमारत किंवा इतर बांधकाम किंवा क्रिडांगण हे केवळ शिक्षणाच्या व कौशल्य विकासाच्या प्रयोजनार्थ वापरण्यात येतील.

१३) शाळा सोसायटी नोंदणी अधिनियम,१८६० (१८६० चा २१) किंवा मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम,१९५० अन्वये नोंदणी झालेल्या संस्थेमार्फत चालविण्यात येत आहे.

१४) शाळा कोणत्याही व्यक्तीच्या, गटाच्या किंवा व्यक्तीसंघाच्या किंवा इतर कोणत्याही व्यक्तीच्या फायद्याकरीता किंवा कोणताही नफा मिळविण्यासाठी चालविण्यात येत नाही.

१५) शाळेचे लेखे सनदी लेखापालाकडून लेखापरिक्षित व प्रमाणित करुन घ्यावेत आणि नियमानुसार योग्य लेखा विवरणपत्रात तयार करावीत. प्रत्येक लेखा विवरणपत्राची एक प्रत दरवर्षी जिल्हा शिक्षणाधिका-याकडे पाठविण्यात यावी.

१६) तुमच्या शाळेला मिळालेल्या मान्यता संकेतांक / युडायस क्रमांक २७११०८०२९०२ असा आहे. हा या कार्यालयाशी कोणताही पत्रव्यवहार करतांना कृपया तो नमुद करावा, याची नोंद घ्यावी.

१७) शिक्षण संचालक/ जिल्हा शिक्षणाधिकारी वेळोवेळी मागणी करतील असे अहवाल व माहिती शाळेने सादर करावी किंवा शाळेच्या मान्यतेच्या शर्तीची निरंतर पुर्तता करण्यासाठी किंवा शाळेच्या कामकाजातील त्रृटी दुर करण्यासाठी शासन किंवा स्थानिक प्राधिकार देईल अशा सुचनांचे पालन करावे.

१८) संस्थेच्या नोंदणीचे कोणतेही असल्यास नुतनीकरण केल्याची सुनिश्चिती करावी.

१९) जोडपत्र " तीन " नुसार इतर शर्ती यासोबत जोडल्या आहेत.

E. P. AAAFI PUBLIC SCHOOL
TIRORA
PALDONGRI

Upadhyay

शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
जिल्हा परिषद, गोंदिया